भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# लोह धातुक खाणी कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९६१

(१९६१ चा अधिनियम क्रमांक ५८)

[ १ नोव्हेंबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Iron Ore Mines Labour Welfare Cess Act, 1961

(Act No. 58 of 1961)

[ *As in force on 1st November, 1977* ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

( १९७८ )

किंमत ४० पैसे

# लोह धातुक खाणी कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९६१

## कलमांचा क्रम

कलमे.

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. लोह धातुकावर उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे.

३. उपकराच्या उत्पन्नाचा विनियोग.

४. सल्लागार समित्या.

५. कर्मचाऱ्यांची नियुक्ती व त्यांच्या शक्ती.

६. केंद्र शासनाची सूट देण्याची शक्ती.

७ या अधिनियमाखाली वित्तव्यवस्था केलेल्या कार्यांचा अहवाल.

८. नियम करण्याची शक्ती.

# लोह धातुक खाणी कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९६१
## (१९६१ चा अधिनियम क्रमांक ५८)[१]

[१९ डिसेंबर, १९६१]

लोह धातुक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांचे कल्याण प्रवर्धन करण्यासाठी असलेल्या कार्यांची वित्तव्यवस्था करण्याकरिता लोह धातुकावर उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे याबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो.––

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास 'लोह धातुक खाणी कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९६१' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

[२][(३) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [३]दिनांकाला तो अंमलात येईल आणि निरनिराळ्या राज्यांसाठी निरनिराळे [४]दिनांक नियत करता येतील.]

लोह धातुकावर उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे.

२. केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून, कोणत्याही खाणीतून काढलेल्या सर्व लोह धातुकावर या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी निश्चित करील त्याप्रमाणे लोह धातुकाच्या दर मेट्रिक टनास पन्नास नये पैसे याहून अधिक नसेल अशा दराने उपकर म्हणून उत्पादन शुल्क बसवले जाईल व त्याची उगराणी केली जाईल.

उपकराच्या उत्पन्नाचा विनियोग.

३. या अधिनियमाखाली बसवलेल्या उत्पादनशुल्काच्या उत्पन्नामधून, केंद्र शासन निश्चित करील तितका उगराणीचा खर्च वजा जाता येणाऱ्या रकमेइतकी रक्कम व त्याचबरोबर उक्त रकमेच्या गुंतवणुकीपासून झालेली कोणतीही प्राप्ती, तसेच केंद्र शासनाला या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मिळालेला अन्य कोणताही पैसा, संसदेने कायद्याद्वारा रीतसर विनियोजन केल्यानंतर केंद्र शासन, लोह धातुक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांचे कल्याणप्रवर्धन करण्यासाठी त्या शासनाच्या मते आवश्यक किंवा समयोचित असणाऱ्या उपाययोजनांच्या संबंधात करावा लागणारा खर्च भागवण्यासाठी, आणि विशेषतः पुढील गोष्टींसाठी वापरू शकेल:––

(क) लोह धातुक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांच्या हितार्थ––

(एक) सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता यांची सुधारणा, रोगप्रतिबंध आणि वैद्यकीय सुविधांची तरतूद व सुधारणा,

(दोन) पाण्याचे साठे आणि धुण्याच्या सोयी यांची तरतूद व सुधारणा,

(तीन) शिक्षणविषयक सोयींची तरतूद व सुधारणा,

(चार) घरांची सोय आणि पोषक आहार यांसुद्धा राहणीमानात सुधारणा, सामाजिक स्थितिसुधार आणि मनोरंजनाच्या सुविधांची तरतूद, आणि

(पाच) कामाच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी वाहनांची तरतूद,

यांस अनुलक्षून केलेल्या उपाययोजनांचा खर्च भागविणे;

---

१. हा अधिनियम १९६३ चा विनियम ११-कलम ३ व अनुसूचीद्वारे गोवा, दमण व दीव येथे लागू करण्यात आला.

२. १९६३ चा अधिनियम २४-कलम २ द्वारे पोटकलम (३) ऐवजी दाखल करण्यात आले.

३. ओरिसा राज्याखेरीज संपूर्ण भारतासाठी १ ऑक्टोबर, १९६३, पहा ; अधिसूचना क्र. जी. एस. आर. १५३५, दिनांक २० सप्टेंबर, १९६३, गॅझेट ऑफ इंडिया, भाग दोन, उपविभाग ३ (१), पृष्ठ १८११.

४. ओरिसा राज्याकरिता १ ऑक्टोबर, १९६३ पहा. अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. १६१४ दिनांक २८ सप्टेंबर, १९६३, गॅझेट ऑफ इंडिया, असाधारण, भाग दोन, उपविभाग ३ (१), पृष्ठ ७३८.

(शा.म.मु.) प्र २ अ एच ४८२५––२ (१०५५–१०-७८)

(ख) लोह धातुक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांच्या कल्याणप्रवर्धनाशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी केंद्र शासनाने मान्य केलेल्या कोणत्याही योजनेच्या सहाय्यार्थ राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण, लोह धातुक खाणीचा मालक किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांना आर्थिक अनुदान देणे ;

(ग) लोह धातुक खाणमालकांपैकी ज्यांनी आपल्या खाणींमध्ये कामाला असलेल्या कामगारांच्या हितासाठी केंद्र शासनाचे समाधान होईल अशा रीतीने विहित दर्जाच्या कल्याणकारी सुविधांची तरतूद केली असेल अशा मालकांना दरवर्षी सहायक अनुदानाची रक्कम देणे ; तथापि लोह धातुक खाणीच्या मालकाला प्रदेय असलेली सहायक अनुदानाची रक्कम ही–

(एक) केंद्र शासनाने किंवा याबाबतीत त्याने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीने निश्चित केली असेल त्याप्रमाणे, कल्याणकारी सुविधांची तरतूद करण्यासाठी लोह धातुक खाणीच्या मालकाने खर्च केलेली रक्कम, किंवा

(दोन) या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारा विहित करण्यात येईल अशी रक्कम,

यापैकी जी कमी असेल तिच्याहून अधिक असणार नाही :

परंतु, लोह धातुक खाणीच्या मालकाने तरतूद केलेल्या कल्याणकारी सुविधांच्या बाबतीत, पूर्वोक्ताप्रमाणे निश्चित करून खर्च केलेली रक्कम जर या बाबतीत केलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या रकमेहून कमी असेल तर, कोणतेही सहायक अनुदान प्रदेय असणार नाही;

(घ) कलम ४ खाली स्थापन केलेल्या सल्लागार समितीच्या सदस्यांचे काही भत्ते असल्यास ते आणि कलम ५ खाली नियुक्त केलेल्या व्यक्तींचे काही वेतन व भत्ते असल्यास ते देणे.

सल्लागार समित्या.

४. (१) केंद्र शासनास लोह धातुकाचे उत्पादन काढणाऱ्या प्रमुख राज्यांसाठी आपणांस योग्य वाटतील तितक्या पण प्रत्येकी एकापेक्षा अधिक नाहीत इतक्या सल्लागार समित्या कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या उपकराच्या किंवा अन्य कोणत्याही रकमांच्या विनियोगाच्या संबंधातील बाबी धरून या अधिनियमाच्या प्रशासनामधून उद्‌भवणाऱ्या ज्या बाबी त्या राज्याने केंद्र शासनाकडे निर्देशित केल्या असतील त्याबाबत केंद्र शासनाला सल्ला देण्यासाठी स्थापन करता येतील.

(२) प्रत्येक सल्लागार समिती ही, केंद्र शासन तिच्यावर नियुक्त करील तितक्या व्यक्तींची मिळून बनलेली असेल आणि हे सदस्य या अधिनियमांनी केलेल्या नियमांद्वारा विहित करण्यात येईल तशा रीतीने निवडले जातील :

परंतु, प्रत्येक सल्लागार समितीमध्ये शासन, लोह धातुक खाणींचे मालक आणि लोह धातुक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेले कामगार यांचे प्रतिनिधित्व करणारे जे सदस्य समाविष्ट असतील त्यांची संख्या समसमान असेल आणि अशा प्रत्येक समितीत निदान एक तरी स्त्री-सदस्य असेल.

(३) प्रत्येक सल्लागार समितीच्या अध्यक्षाची नियुक्ती केंद्र शासन करील.

(४) केंद्र शासन प्रत्येक सल्लागार समितीच्या सर्व सदस्यांची नावे **शासकीय राजपत्रातून** प्रकाशित करील.

कर्मचाऱ्यांची नियुक्ती व त्यांच्या शक्ती.

५. (१) केंद्र शासनास या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ निरीक्षक, कल्याण प्रशासक, आणि स्वतःला आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी व कर्मचारी नियुक्त करता येतील.

(२) याप्रमाणे नियुक्त झालेली प्रत्येक व्यक्ती 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)–कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

(३) कोणत्याही निरीक्षकाला किंवा कल्याण प्रशासकाला––

(क) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी जेथे प्रवेश करणे त्याला आवश्यक वाटेल अशा कोणत्याही जागी कोणत्याही योग्य वेळी, त्याला योग्य वाटेल असे काही सहाय्य मिळाल्यास त्यानिशी प्रवेश करता येईल; आणि

(ख) अशा जागेमध्ये आपली कर्तव्ये योग्यरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक ते काहीही करता येईल.

केंद्र शासनाची सूट देण्याची शक्ती.

६. या अधिनियमात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही राज्यात किंवा त्याच्या एखाद्या भागात लोहधातुक खाणकाम उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांचे कल्याणप्रवर्धन करण्याबाबतच्या कार्यांच्या वित्तव्यवस्थेसाठी पर्याप्त उपबंध करणारा कायदा अंमलात आहे अशी केंद्र शासनाची खात्री झाल्यास ते **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे सर्व किंवा त्यांपैकी काही उपबंध त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अपवादांच्या व आपरिवर्तनांच्या अधीनतेने, अशा राज्याला किंवा भागाला लागू होणार नाहीत किंवा लागू होतील असे निदेशित करू शकेल.

या अधिनियमाखाली वित्तव्यवस्था केलेल्या कार्यांचा अहवाल.

७. केंद्र शासन प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर होईल तितक्या लवकर मागील वित्तीय वर्षात या अधिनियमाखाली वित्तव्यवस्था झालेल्या आपल्या कार्यांचा वृत्तांत देणारा अहवाल व त्याबरोबर हिशोबाचे विवरणपत्र **शासकीय राजपत्रातून** प्रकाशित करवील.

८. (१) केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील. **नियम करण्याची शक्ती.**

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, या नियमांद्वारा पुढील गोष्टीं-बाबत उपबंध करता येईल:—

(क्) या अधिनियमाखाली बसवलेल्या उत्पादनशुल्काचे निर्धारण व उगराणी ;

(ख्) उपकराच्या उगराणीचा खर्च ठरवणे ;

(ग्) कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांवर उपकराची रक्कम व अन्य काही पैसा असल्यास त्याचा विनियोग कोणत्या रीतीने करता येईल ते ;

(घ्) कलम ३ च्या खंड (ख्) खाली पैसे मंजूर करण्याबाबत नियमन करणाऱ्या शर्ती;

(ङ्) कलम ३ च्या खंड (ग्) च्या प्रयोजनार्थ लोह धातुक खाणीच्या मालकांनी तरतूद करावयाच्या कल्याणकारी सुविधांचा दर्जा व त्या खंडाचा उपखंड (दोन) व परंतुक यांमध्ये निर्देशित केलेल्या रकमा;

(च्) कलम ४ खाली स्थापन केलेल्या सल्लागार समित्यांची रचना, त्यांचे सदस्य ज्या रीतीने निवडले जातील ती रीत, अशा सदस्यांचा पदावधी, त्यांना प्रदेय असणारे काही भत्ते असल्यास ते आणि सल्लागार समित्या ज्या रीतीने आपले कामकाज चालवतील ती रीत ;

(छ्) कलम ५ खाली नियुक्त केलेल्या सर्व व्यक्तींची भरती, सेवाशर्ती आणि कर्तव्ये;

(ज्) लोह धातुक खाणीच्या मालकांनी, एजंटांनी किंवा व्यवस्थापकांनी आकडेवारीच्या रूपातील माहिती पुरविणे.

(३) केंद्र शासन या अधिनियमाखाली कोणताही नियम करताना त्याचा भंग हा द्रव्यदंडास पात्र होईल असे निदेशित करू शकेल.

(४) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवला गेला ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल, किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## THE IRON ORE MINES LABOUR WELFARE CESS ACT, 1961

## लोह धातुक खाणी कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९६१

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| agent | एजंट | [S.8(h)] |
| amelioration of social conditions | सामाजिक स्थितिसुधार | [S.3(a)(iv)] |
| defray | भागविणे | [S.3(a)] |
| grants-in-aid | सहायक अनुदाने | [S.3(c)] |
| iron ore | लोह धातुक | [S.2] |
| mining industry | खाणकाम उद्योग | [S.3] |
| promote the welfare of— | —चे कल्याणप्रवर्धन करणे | [S.3] |
| public health and sanitation | सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता | [S.3(a)(i)] |
| water supplies | पाण्याचे साठे | [S.3(a)(ii)] |
| Welfare Administrator | कल्याण प्रशासक | [S.5(1)] |
| welfare facilities | कल्याणकारी सुविधा | [S.3(c)] |

## लोह धातुक खाणी कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९६१

## THE IRON ORE MINES LABOUR WELFARE CESS ACT, 1961

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| एजंट | agent | [S.8(h)] |
| कल्याणकारी सुविधा | welfare facilities | [S.3(c)] |
| कल्याण प्रशासक | Welfare Administrator | [S.5(1)] |
| खाणकाम उद्योग | mining industry | [S.3] |
| —चे कल्याणप्रवर्धन करणे | promote the welfare of— | [S.3] |
| पाण्याचे साठे | water supplies | [S.3(a)(ii)] |
| भागविणे | defray | [S.3(a)] |
| लोह धातुक | iron ore | [S.2] |
| सहायक अनुदाने | grants-in-aid | [S.3(c)] |
| सामाजिक स्थितिसुधार | amelioration of social conditions | [S.3(a)(iv)] |
| सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता | public health and sanitation | [S.3 (a)(i)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई